ePaper
आमदारांना अपात्र ठरवण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टाला नाही:प्रकाश आंबेडकर

| वर्ष - 6 | अंक - 360 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**
- महापालिका हद्दीत मालमत्ता करात सवलत
- उद्यान संवर्धनाला 'खतपाणी'!
- अखंडित विजेसाठी मंत्रिमंडळात मोठा निर्णय

www.mahaenews.com | गुरुवार दि. 20 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# होर्डिंगचा सांगाडा 'आवळला'!

## » आयुक्तांची आक्रमक भूमिका : 15 दिवसांत संरचना मजबुतीचे प्रमाणपत्र द्या

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील 433 अनधिकृत जाहिरात फलक धारक हे जाहिरात करत असून, या फलकांसाठी स्थिरता प्रमाणपत्र महापालिकेकडून प्रमाणित मान्यता दिलेली नाही. भविष्यात वादळ वाऱ्यामुळे हे फलक उन्मळुन पडून किवळे सारखी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उच्च न्यायालयात प्रलंबित याचिकेच्या अधिन राहून अनधिकृतफलक धारकांनी व अधिकृत फलक धारकांनी कोणत्याही महापालिकेच्या पॅनलवरील संरचना अभियंत्याचे संरचना मजबुतीचे (स्थिरतेचे) प्रमाणपत्र व जाहिरात फलकाच्या 10 बाय 8 इंचाच्या छायाचित्राच्या दोन प्रती 15 दिवसाचे आत आकाशचिन्ह व परवाना विभागात सादर कराव्यात. अन्यथा संबंधित फलक मालकावर फौजदारी कारवाई करण्यात येईल, अशा इशारा महापालिकेने दिला आहे**



**अन्यथा फौजदारी गुन्हा दाखल करणार**


कायदा होर्डिंग अन् स्ट्रक्चरल ऑडिटचा प्रश्न ऐरणीवर
# प्रशासनाचा बेजबाबदारपणा?
» लोकप्रतिनिधींची मागणी : आयुक्तांच्या भूमिकेकडे लक्ष


रावेत- किवळे येथील दुर्घटनेनंतर 'महाईन्यूज' ने "प्रशासन बेजबाबदार?" या मथळ्याखाली महापालिका प्रशासनाच्या चुकीच्या धोरणाबाबत वृत्त प्रसिद्ध केले होते. यासह शहरातील लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांनीही याबाबत आक्रमक भूमिका घेतली होती. अखेर प्रशासनाने शहरातील होर्डिंगबाबत कठोर पावले उचलण्यास सुरूवात केली आहे.

रावेत, किवळे येथे सोमवार (दि.17) रोजी अनधिकृत फलक पडून पाच जणांचा मृत्यू झाला तर तिघे जखमी झाले आहेत. या घटनेनंतर अनधिकृत जाहिरात फलक व अधिकृत फलकांच्या स्ट्रक्चरल ऑडिटसह, राज्य सरकारचे जाहिरात धोरणाची अंमलबजावणी करण्यासह विविध बाबींसाठी महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी कठोर पाऊले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.

याच अनुषंगाने बुधवार (दि.19) रोजी महापालिकेत शहरातील सर्व फलक धारकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख आदी उपस्थित होते.

### फलक काढण्याचा खर्चसुद्धा वसुल करणार...

» महापालिकेच्या कार्यक्षेत्रात पालिकेची पूर्वपरवानगी घेऊनच खाजगी जागेत जाहिरात फलक उभा करण्याची तरतुद आहे. सध्या पूर्व मान्सुन, वादळ-वारे व अवकाळी पावसाची शक्यता आहे. शहरातील न्यायालयात खटला दाखल असलेल्या 433 अनधिकृत होर्डिंगचे व अधिकृत असलेल्या 1 हजार 344 होर्डिंगचे स्थिरता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे व तपासणी संदर्भात धडक कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने शहरातील ज्या जाहिरात फलकांना परवाना दिलेला आहे अशा सर्व अधिकृत फलकांचे सन 2023-24 साठी नुतनीकरण करताना मिळकतीच्या जमिनीच्या मालकाच्या, पालिकेच्या किंवा प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र महापालिकेच्या पॅनलवरील संरचना अभियंत्याचे संरचना मजबुतीचे (स्थिरतेचे) प्रमाणपत्र घेण्यात येणार आहे. जाहिरात फलकाच्या 10 बाय 8 च्या छायाचित्राच्या दोन प्रती या अनुषंगाने सर्व परवानाधारकाने 15 दिवसाच्या आत महापालिकेच्या पॅनलवरील संरचना अभियंत्याचे संरचना मजबुतीचे (स्थिरतेचे) प्रमाणपत्र सादर करावे. प्रमाणपत्र सादर न केल्यास जाहिरात फलक अनधिकृत गृहित धरून महापालिकेमार्फत काढण्यात येईल. जाहिरात फलक काढण्याचा संपूर्ण खर्च हा जाहिरातदारांकडून वसूल करण्यात येईल.

### तीन दिवसांत फलक काढून घ्या...

» शहरातील ज्या जाहिरात फलकांचे मंजुर मोजमापापेक्षा जास्त मोजमापाचा जाहिरात फलक आहे अशा जाहिरात फलकांचे वाढीव मोजमाप 7 दिवसात स्वतःहून काढून घ्यावे. अन्यथा फलक अनधिकृत गृहित धरून कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही महापालिकेने दिला आहे.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या जाहिरात फलकांव्यतिरिक्त जाहिरातदारांनी अद्यापही पालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत जाहिरात फलक उभा असल्यास 3 दिवसात फलक स्वतः काढून घ्यावा. अन्यथा नियमानुसार अनधिकृत फलक काढण्यात येईल. फलक काढण्याचा खर्च हा जाहिरातदारांकडून वसुल करून विद्रुपीकरण केल्याबद्दल फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

# महापालिका हद्दीत मालमत्ता करात सवलत!




## पुण्यातील नागरिकांना मोठा दिलासा

।मुंबई ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महापालिकेमार्फत स्वतःच्या मालकीच्या घरात राहत असल्यास घरपट्टीमध्ये ४० टक्के सवलत यापूर्वी मिळत होती. ही सवलत पुन्हा सुरू करण्याबाबत पुणेकर नागरिकांची असलेली अनेक वर्षांपासुनची मागणी लक्षात घेता उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी पुढाकार घेऊन मार्च २०२३ मध्ये अधिवेशन काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आला असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.**

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता कर आकारणी करताना वार्षिक भाड्यातून १०% ऐवजी १५% सवलत आणि मालमत्ताधारक स्वत: राहण्यासाठी मालमत्तेचा वापर करत असल्यास त्यांना वार्षिक मालमत्ता करपात्र रक्कम निश्चित करताना ४०% सवलत देण्यास शासनाने मान्यता दिली.

०३ डिसेंबर, १९६९ रोजी राज्य शासनाने महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्यासाठी निर्गमित केलेल्या प्रारुप अधिसुचनेमध्ये असलेल्या तरतूदीनुसार पुणे महानगरपालिकेने दि. ०३ एप्रिल, १९७० रोजी मुख्य सभा ठराव पारित करुन प्रारुप अधिसुचनेमधील तरतूदी थेट लागु केल्या व त्याप्रमाणे मालमत्ता कर आकारणी करतांना वार्षिक भाड्यातून १०% ऐवजी १५% सवलत आणि मालमत्ताधारक स्वत: राहण्यासाठी मालमत्तेचा वापर करत असल्यास त्यांना वार्षीक मालमत्ता करपात्र रक्कम निश्चित करतांना 40% सवलत अशा करआकारणीची प्रत्यक्ष अंमलबजावणी केलेली आहे. मात्र याबाबत प्रत्यक्ष अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आलेली नसल्याची बाब पुणे मनपाच्या सन 2010 ते 2013 च्या स्थानिक लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आली. यावर विधीमंडळाच्या लोकलेखा समितीच्या शिफारशीस अनुसरून शासनाच्या दि. 28 मे, 2019 रोजीच्या पत्रानुसार पुणे महानगरपालिकेने 1970 मध्ये पारित केलेला मुख्य सभा ठराव दि. ०१ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयान्वये विखंडीत करण्यात आला.यामुळे 40 % सवलतीचा लाभ घेतलेल्या अंदाजे 5.4 लाखांपेक्षा अधिक मालमत्ताधारकांकडुन सुमारे रु. ४०१ कोटीहून अधिक व १५ % वजावटीचा लाभ घेतलेल्या अंदाजे 8.82 लाख मालमत्ता धारकांकडुन सुमारे 141.087 कोटी इतकी फरकाची रक्कम वसुलीची कारवाई करणे आवश्यक होते. अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात असलेली फरकाची रक्कम पुर्वलक्षी प्रभावाने वसुल करावयाची झाल्यास मालमत्ता धारकांवर खुप मोठा बोजा पडणार असल्याने पुणे महानगरपालिकेने दि. 28 ऑगस्ट, 2019 रोजी पुन्हा एक मुख्य सभा ठराव पारित करुन या सवलतीमुळे वसुली करावयाची थकबाकीची रक्कम पुर्वलक्षी प्रभावाने करु नये व 2019 पर्यंत ज्या पध्दतीने सवलत देण्यात येत होती ती तशीच यापुढेही सुरू राहावी अशी मागणी शासनाकडे केली होती. त्याअनुषंगाने पालकमंत्र्यांनी पुणेकर नागरिकांच्या या मोठ्या समस्येचे निकारण करण्याकरिता मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींसमवेत केलेल्या आग्रही मागणीस आज यश आले.

# पिंपळे निलख येथे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राची ‘पायाभरणी’

## माजी नगरसेवक तुषार कामठे यांचा पुढाकार

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपळे निलख येथे प्रस्तावित ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन अखंड हरिनाम सप्ताहाचे अध्यक्ष महेश इंगवले- पाटील आणि पिंपरी-चिंचवड ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष रामदास जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले.**

माजी नगरसेवक तुषार कामठे यांनी या विरगुळा केंद्रासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्याची उभारणी आता सुरू झाली असून, आगामी ८ महिन्यांमध्ये केंद्राचे काम पूर्ण करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. उद्घाटन प्रसंगी उत्सव कमीटीचे उपाध्यक्ष महेश कामठे, विशाल कामठे, सौरभ गीते उपस्थित होते.

तुषार कामठे म्हणाले की, प्रभाग २६ च्या जेष्ठ नगरसेविका आरती चौंधे व मी सातत्याने विरंगुळा केंद्रासाठी पाठपुरावा करत होतो. तसेच माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे यांनी मदत केली. तसेच, अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळेच आमचे प्रयत्न यशस्वी झाले. त्याबद्दल मी प्रभागाचा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचे आभार व्यक्त करतो.

विंरगुळा केंद्रासाठी तब्बल ५७.५० लाख रूपयांचे काम मंजुर झाले असून, २५ लाखाची तरतुद उपलब्ध आहे. त्यामुळे येणाऱ्या ८ महिन्यामध्ये प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांना त्यांचा हक्काचे विरंगुळा केंद्र उपलब्ध होणार आहे. ६० बाय ३२ जागेत प्रशस्त सभागृह तसेच तसेच, पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या मजल्याचेही काम हाती घेण्यात येणार आहे.

### राजकारण नव्हे, नागरिकांचे स्वप्न पूर्ण करायचे होते...

**» विरंगुळा केंद्राच्या कामाबाबत मागील काही दिवसांपासून ज्येष्ठ नागरीकांना चुकीचे सांगितले जात होते व त्यावर राजकारण करण्याचा प्रयत्न केला जात होता. मात्र, माजी नगरसेविका आरती चोंधे आणि आम्हाला कल्पना होती की आमच्या पाठपुराव्याला यश मिळणार आहे. आम्हाला ज्येष्ठ नागरिकांच्या कामामध्ये राजकारण करायचे नव्हते, म्हणून आम्ही उद्घाटनापेक्षा काम चालू करण्यावर भर देत होतो. तसेच, माझ्या ५ वर्षांच्या अजेंड्यामधील आणखी एक काम पूर्णत्वास येत आहे. ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न पूर्ण केल्याचा आनंद होत आहे, अशा भावना माजी नगरसेवक तुषार कामठे यांनी व्यक्त केल्या.**



# पुणे महापालिका तुपाशी, तर ‘पीएमआरडीए’ उपाशी!

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



राज्य सरकारच्या मालकीच्या, मात्र खासगी संस्था किंवा नागरिकांना भाडेतत्त्वावर देण्यात आलेल्या जमिनी (वर्ग-दोन) आता रस्त्यांसह विविध विकास प्रकल्पांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अशा जमिनींचा मोबदला जागा मालकांना काही अटींवर विकास हस्तांतरण हक्काच्या (टीडीआर) स्वरूपात देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे पुणे महापालिकेला फायदा होणार आहे. मात्र एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर) लागू नसल्याने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पुणे मेट्रोपोलिटन रिजन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी – पीएमआरडीए) या निर्णयाचा फायदा होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.राज्य सरकारकडून मालकीच्या जमिनी या भाडेतत्त्वावर आणि काही अटीं-शर्तींवर विविध संस्था अथवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशा जमिनी मालकी हक्काच्या (वर्ग-एक) करण्यासाठीची प्रक्रिया राज्य सरकारने यापूर्वीच निश्चित करून दिली आहे. त्यासाठी राज्य सरकारला जमिनींच्या चालू बाजार मूल्यदराने (रेडीरेकनर) अधिमूल्य भरल्यानंतर त्या मालकी हक्काच्या होतात. परंतु अधिमूल्याची रक्कम मोठी होत असल्याने अशा जमिनी मालकी हक्काच्या करून घेण्यास कमी प्रतिसाद मिळतो. अशा वर्ग-दोनच्या जमिनी शहरांच्या हद्दीत देखील मोठ्या प्रमाणावर आहेत.

मात्र, या जमिनी स्थानिक स्वराज्य संस्थांना पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ताब्यात घ्यावयाच्या झाल्यास, त्या मोबदल्यात जागामालकाला टीडीआर किंवा चटई क्षेत्र निर्देशांक (फ्लोअर स्पेस इंडेक्स – एफएसआय) न देता रोख रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावी लागत होती.

# उद्यान संवर्धनाला 'खतपाणी'!

## » देखभाल दुरुस्ती तातडीने करा : अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या सूचना





।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्यानांमध्ये स्वच्छता ठेवणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, नामफलक लावणे, देखभाल दुरुस्ती विषयक कामे तातडीने करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी उद्यान निरिक्षक व संबधित उद्यानाचे कामकाज पाहणा-या ठेकेदारांना दिल्या.अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणा-या महानगरपालिकेच्या गणेश विजन आकुर्डी उद्यान, श्री संत ज्ञानेश्वर उद्यान, स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान गणेश तलाव, श्री स्वामी समर्थ उद्यान तसेच स्पाईन रोड मधील दुभाजक येथील उद्यान विषयक कामकाजाची पाहणी आज अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील व उद्यान विभागाचे विभाग प्रमुख रविकिरण किरण घोडके यांनी केली त्यावेळी त्यांनी संबंधितांना सूचना दिल्या**

यावेळी अ क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, उद्यान अधिक्षक गोरक्ष गोसावी, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार आदी उपस्थित होते. सकाळी 9 वाजता अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील आणि घोडके यांनी महानगरपालिकेच्या उद्यानांना अचानक भेटी देऊन तेथील सुविधांचा आढावा घेतला.

यावेळी स्पाईन रोड मध्य दुभाजक रस्त्यांवर नवीन शोभिवंत झाडे लावणे व पाण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना संबंधित अधिका-यांना दिल्या आहेत.

### नवीन उद्यानाचा आराखडा तयार करणार...

» गणेश विजन आकुर्डी उद्यान येथे भेट देऊन तेथील बागेच्या नावाचे फलक लावणे, कंपाऊंडची लोखंडी ग्रील तयार करणे, नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, शौचालयाची स्वच्छता राखणे व साईन बोर्ड लावणे. श्री संत ज्ञानेश्वर उद्यान येथील पाण्याच्या टाकीवरील साफसफाई करणे, सावलीच्या ठिकाणी इंनडोअर झाडे लावणे, म्युरल आर्ट करिता नियोजन करणे तसेच नवीन उद्यानाचा आराखडा तयार करणे, गणेश तलावामधील गाळ काढणे, उद्यानातील सावलीच्या ठिकाणी व मोकळ्या जागेवर पावसाळ्यात लॉन विकसित करणे, श्री स्वामी समर्थ उद्यान येथे भेट दिली असता उद्यानामध्ये श्री स्वामी समर्थ यांचे मंदिर असल्याने भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे तसेच लॉन विकसित करून शोभिवंत झाडांची लागवड करण्याबाबतच्या सूचना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी यावेळी दिल्या.

# महापालिका अग्निशमन विभागाचे 'आत्मचिंतन'

## » दोन ठिकाणी मॉकड्रिल : यंत्रणांची सज्जता तपासली



### अन् कर्मचाऱ्यांचा जीव भांड्यात पडला!

» दुपारी तीन वाजता पुन्हा पिंपरी चिंचवड महापालिका भवनात आग लागली अशी माहिती अग्निशमन विभागाला मिळाली. दरम्यान महापालिकेच्या चौथ्या मजल्यावरील सर्व कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात आले. चौथ्या मजल्यावर एक अभिभागातून धूर देखील येत असल्याचे दिसत होते दरम्यान अग्निशमन विभागाच्या जवानांनी आग विझवण्याची यंत्रणा सज्ज केली. काही वेळातच ही आग नसून मॉकड्रिल असल्याचे लक्षात येतात सर्व कर्मचाऱ्यांचा जीव भांड्यात पडला.



।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणांची सज्जता तपासण्यासाठी पिंपरी-चिंचवड अग्निशमन विभागाने मॉकड्रिल केले. बुधवारी (दि. 19) दिवसभरात शहरात दोन ठिकाणी अग्निशमन विभागाचे मॉकड्रिल पार पडले.**

सकाळी पहिल्या शिफ्ट मधील अग्निशमन विभागाचे जवान कामावर हजर झाले. त्याच वेळी अचानक अग्निशमन विभागाच्या नियंत्रण कक्षातील फोन खणाणला. एल्प्रो मॉल, चिंचवडगाव येथे आग लागली असल्याची वर्दी मिळाली. अन पिंपरी, थेरगाव अग्निशमन केंद्रातील बंब एल्प्रो मॉल मध्ये दाखल झाले. मॉल मधील अग्निशमन यंत्रणा जवानांनी तपासून पाहिली. तसेच आगीची वर्दी मिळाली त्या ठिकाणी पाहणी केली. त्यानंतर हे मॉकड्रिल असल्याचे निदर्शनास आले.

शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या चिंचवडगावात एल्प्रो मॉल आहे. मॉलमध्ये शेडको दुकाने असल्याने तिथे दररोज हजारो नागरिक भेट देत असतात. (PIMPRI) आगीसारखी घटना घडल्यानंतर यंत्रणा कशी काम करेल, याचे प्रात्यक्षिक या मॉकड्रील द्वारे घेण्यात आले.

## संपादकीय »

### कडेलोटाचं दुःख

***पश्चिम व दक्षिण-पूर्वेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांच्या एकत्रीकरणामुळे महाराष्ट्रात वादळवारे, अवकाळी पाऊस अन् गारपिटीची स्थिती उद्भवली, अशी तांत्रिक कारणमीमांसा सध्याच्या बेफाम पावसाची केली गेली; मात्र या सततच्या नैसर्गिक संकटाने शेतकरी ही जमातच जन्म-मृत्यूच्या कडेलोटावर नेऊन ठेवली, त्याचे काय करायचे? हा प्रश्न गहन बनतो आहे. मंत्रीमंडळाला घेऊन मुख्यमंत्री अयोध्येला गेले. तत्पूर्वी रामनवमी व हनुमान जन्मोत्सवाच्या अभूतपूर्व जल्लोषाने डोळ्यांचे पारणे फेडले. या धुंदीत अवकाळी पावसाचे अपार दुःख झाकोळले गेले. सोशल मीडिया तर आजही या धुंदीतच आहे.***

अयोध्या दौऱ्यावर झालेल्या टीकेनंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने आपत्तीग्रस्तांच्या बांधावर जाऊन संवेदनीशीलता दाखवली. रामरायाला शेतकरी हिताचे साकडे घातले, असे ते म्हणाले. रामरायाकडे जर शेतकऱ्यांची आर्जवं पोहोचत असती, तर आजवरच्या लक्षावधी आत्महत्या टळल्या असत्या. नैसर्गिक संकटासाठी देवाला साकडे घालण्याआधी दिमतीला असलेली यंत्रणा कार्यक्षमतेने वापरली तरी पुष्कळ दिलासा मिळू शकेल. शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या, पंचनामे, पाहणी दौरे या सरकारी छापात यंत्रणा अडकणार नाही, याची काळजी घ्या, एवढेच संकटग्रस्तांचे मागणे असते. बांधावर गेल्यावर शेतकऱ्यांना समाधान मिळाले असले तरी ते शाब्दिक ठरते. जोपर्यंत मदत प्रत्यक्ष पोहोचत नाही, तोपर्यंत हे दिलासेही उसासे ठरतात. गेल्या महिन्यात शाश्वत शेतीसाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात भरघोस उपाययोजना जाहीर केल्या. शेतकरी महासन्मान निधीत वाढ केली. कांदा उत्पादकांचीही दखल घेत त्यांना तीनशे रुपयांचे सानुग्रह अनुदान जाहीर केले. विरोधी पक्षांनी आवाज उठविल्यानंतर त्यात पन्नास रुपयांची भर घातली गेली. मात्र, सरकारी आदेश निघेपर्यंत मदतीच्या कालावधीला केवळ चार दिवस राहिले. मग मिळेल ती मदत पदरी पाडून घेण्यासाठी शेतकऱ्यांनी तोबा गर्दी केली. परिणामी कांदा दर आणखी कोसळले. चांदी पुन्हा व्यापाऱ्यांचीच झाली. तत्पूर्वीच्या मार्चमधील आपत्तीतील नुकसानीचे पंचनामे सुरुवातीला सरकारी कर्मचाऱ्यांचा संप आणि नंतर तांत्रिक बाबींमुळे आजही पूर्णत्वास गेलेले नाहीत. विमा कंपन्यांची एकूणच मक्तेदारी व मनमानीविषयी ठणाणा करूनही सरकारच्या कानीकपाळी काहीच पोहोचू शकलेले नाही. सततचा पाऊस यापुढे नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित करण्याची घोषणा सरकारने चार दिवसांपूर्वीच केली होती.

# धन समर्पण द्या आम्हाला निरूपण, प्रवचन तुम्हाला !




कोकणात रायगड जिल्ह्यात रेवदंडा [ता. अलिबाग ] येथे १९२२ साली जन्मलेले नारायण विष्णू धर्माधिकारी हे एका मंदिराचे पुजारी होते. कोणत्याही पुजाऱ्याला भाविकांच्या मानसिकतेचा उत्तम अभ्यास होतो. सतत मंदिरात येणाऱ्या भाविकांएवढे सोपे टार्गेट कुणीच असू शकत नाही. देव,धर्म आणि अध्यात्माच्या नावाखाली त्याला काहीही सांगितले तर पटते याची खात्री पुजाऱ्यांना झाली की त्याचा महंत,महामंडलेश्वर या दिशेने प्रवास सुरु होतो. अनेक वर्ष मंदिरात सेवा दिल्यावर पुजारी नारायण धर्माधिकारी पुढे नानासाहेब धर्माधिकारी झाले. त्यांनी काही भाविकांना विविध तीर्थक्षेत्राची यात्रा घडवून आणल्यावर गावात " समर्थ प्रासादिक अध्यामिक सेवा समिती " स्थापन केली. दासबोधाचा प्रसार करण्याचा उद्देश ठेवून त्यांनी १९४२ साली पहिली "श्री बैठक" घेऊन त्या माध्यमातून रामदास स्वामींच्या संदेशाचे प्रसारण सुरु केले. पुढे अनुषंगिक विषय म्हणून विविध क्षेत्रात जुजबी कामे सुरु केली त्यालाच आज महान समाजसेवा म्हटले जाते. धन,श्रम हे समर्पण आम्हाला द्या आणि त्या बदल्यात निरूपण,प्रवचन आणि कोरडे अध्यात्म तुम्हाला ठेवा असा मतलबी संदेश देण्याचा हा कोट्यवधींचा धार्मिक धंदा आहे दुर्दैवाने त्याला सरकारी अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

कोकणात रायगड,रत्नागिरी ,ठाणे जिल्ह्यात रामदास स्वामी आणि त्यांच्या दासबोध ग्रंथाची थोरवी सांगत असताना फावल्या वेळात कुणालाही सहज पटेल अश्या अध्यामिक गोष्टी सांगत असताना या बैठकांना ब्राह्मण कमी आणि ओबीसी समूह मोठ्या संख्येने उपस्थित राहायला लागले. कोकणात या बैठकांना रामदासी बैठका म्हणूनही ओळखले जाते. जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ या पायावर आधारित दासबोधाचे तत्वज्ञान कुणबी,आगरी,कोळी या ओबीसींच्या मेंदूवर कोरत नानासाहेब धर्माधिकारी यांनी आपल्या हयातीत लाखो लोकांचा भक्त परिवार तयार केला. गाभा दासबोधाचा मात्र वरचे मार्गदर्शन भक्तीचे अशी गोळी लाखो लोकांना देऊन कोकणात या रामदासी बैठकांनी उच्छाद मांडल्यावर लाखोंचे मेळावे घेऊन या संप्रदायाने शक्ती प्रदर्शन करीत राजकारण्यांना दखल घेण्यास भाग पाडले. परिणामी गल्लीपासून दिल्ली पर्यंतचे विविध पुरस्कार नानांच्या पर्यंत येऊ लागले.

२००८ मध्ये नाना धर्माधिकारी यांचा मृत्यू झाल्यावर त्यांनी वाढवून ठेवलेल्या या भक्ती मांडवाचा सहारा त्यांचे पुत्र दत्तात्रय उर्फ अप्पासाहेब धर्माधिकारी यांनी घेतला. पित्याच्या तुलनेत अप्पा दासबोधावर फारच रसाळ प्रवचन म्हणजे निरूपण करायला लागल्याने ते अधिक लोकप्रिय झाले. त्यांनी नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान ही नवी संस्था निर्माण करून भक्तांची आर्थिक आवक तिकडे वळवली. आजच्या घडीला या संस्थेचे अप्पा संस्थापक अध्यक्ष आणि त्यांचे तीन चिरंजीव सचिन उमेश आणि राहुल हे विश्वस्त म्हणून काम बघत आहेत. दासबोधातून परमार्थाची शिकवण देणारे आप्पा धर्माधिकारी मात्र घरातच संस्था काढून कोट्यवधी रुपयांच्या देणग्यांचा स्वार्थ साधत आहेत. चार बापलेकांच्या संस्थेला गेल्या काही वर्षात सरकारी मदतीचे ओघ अमर्याद सुरु असतात आणि कोमात गेलेल्या कोणत्याही भक्ताला त्याचे काहीही वाटत नाही.

पिता नाना धर्माधिकारी याना २००८ साली महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळाल्यावर या वर्षी पुत्राचाही त्याच पुरस्कारासाठी नंबर लागला आणि त्याच्या वितरणात १३ भाविकांना आपल्या प्राणाचे बलिदान द्यावे लागले. कोकणातील ओबीसी स्त्रिया या रामदासी बैठकांना का जातात याची अतिशय अभ्यासू मांडणी चित्रलेखाच्या तत्कालीन पत्रकार संध्या नरे पवार यांनी " तिची भाकर कुणी चोरली ? " या मनोविकासने काढलेल्या पुस्तकातून अतिशय विस्ताराने केली आहे. खारघर येथील घटनेनंतर सोशल मीडियावर या धर्माधिकारी बाबांचे प्रताप उघड करणाऱ्या अनेक पोस्ट व्हायरल होत आहेत त्यातला मतितार्थ सर्वांनी समजून घेण्याची गरज आहे. जनतेच्या पैश्यातून चाललेली उधळपट्टी आणि बुवा बाबांचे उदात्तीकरण यामुळे या राज्याचे काहीही भले होणार नाही हे सध्या नागरिकाला कळत असताना राज्याच्या नेतृत्वाने डोळ्यावर पट्टी बांधून स्वतःला कुणाचा तरी भक्त म्हणून पुढे करावे यासारखी लाजिरवाणी बाब अन्य कोणताही असू शकत नाही हेही या निमित्याने समोर आले आहे.

या प्रकरणी मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांनी घेतलेले आक्षेप महत्वाचेआहेत ते म्हणतात "

## 'कर' साऱ्यांचे जुळू दे!

**सोशल मीडियावर येणारे बहुतेक मेसेज हे पुढे ढकललेले असतात. कोणतीही पडताळणी न करता, शहानिशा न करता, विचार न करता ते जसे विविध व्हॉट्स अॅप ग्रुपवर, परिचित व्यक्तींना पाठवले जातात; त्याच पद्धतीने हे मेसेज पाहणारे (होय, पाहणारेच म्हणावे लागेल, कारण पूर्ण समजून घेऊन खूप कमी जण वाचतात) लोक सहमत असल्याचे अंगठे त्यावर उमटवत असतात.**

यापेक्षाही गंभीर म्हणजे असा ढकललेला मजकूर खराच आहे, असा ठाम विश्वास बहुतेकांना असतो. बरेचदा राजकीय हेतूने किंवा अन्य काही उद्देशाने प्रेरित होऊन मूळ मजकूर पाठवला जातो आणि मग तो शेकडो / हजारो लोकांपर्यंत ढकलला जातो. हेच खरे असे इतके पक्के वाटत असते, की समोर वास्तवाचा आरसा धरला तरी व्हॉट्स अॅप युनिव्हर्सिटीमध्ये मिळालेले ज्ञान हे अंतिम असल्याचा साक्षात्कार भल्याभल्यांना झालेला असतो. यात अगदी मेरिटधारी, पदवीधर, उच्चशिक्षित, उच्च पदांवर काम करणारे, शिक्षक, व्यावसायिक, प्रशासनातील लोकसुद्धा असतात.

साधी भाजी घेताना किंवा एखादी वस्तू खरेदी करताना त्याचा दर्जा, किंमत, टिकण्याची हमी याबाबत चौफेर माहिती घेऊन घासाघीस करून ती घेणारे लोक



व्हॉट्स अॅपवरील ढकललेले मेसेज वास्तवाला धरून आहेत का, याचा मात्र बिलकुल विचार करत नाहीत.

असाच एक मेसेज माझ्या एका ग्रुपवर आला. त्यात दोन मुद्दे होते, एक : सीमेवरील जवानांना मिळणाऱ्या सेवेचा/ वस्तूंचा दर्जा पाहून आपण कर भरतो तो योग्यच ठिकाणी जातो याची खात्री पटली आणि दोन : हा दर्जा गेल्या काही वर्षांतच सुधारला, पूर्वी जवानांची स्थिती वाईट होती.

या मेसेजला अर्थातच सहमतीचे अंगठे मिळाले. त्याचे सर्वांत मोठे कारण सीमेवरील जवान असा उल्लेख आला, की आपण सारेच स्वाभाविकपणे भावनाशील होतो. ती अगदी नैसर्गिक कृतज्ञता भावना आहे.

जीवाची बाजी लावणाऱ्या जवानांचा कोणालाही अभिमानच वाटायला हवा. मुद्दा तो नाही. मुद्दा हा आहे, की कर भरायचे असतात ते देशाच्या सर्व प्रकारच्या गरजांसाठी, प्रगतीसाठी, कारभारासाठी. यात शिक्षण, आरोग्य, निवारा, वाहतूक/ दळणवळण, विज्ञान संशोधन, शेती, कारागिरी, उद्योग, व्यापार, उत्पादन असे सर्वच येते. सीमेवरील जवानाचा गणवेश, बूट, आहार जसा दर्जेदार असायला हवा त्याचप्रमाणे शेतकऱ्याला उत्पादन खर्च आणि उत्पन्न यांचा मेळ बसवता यायला हवा.

कामगारांना मूलभूत गरजा भागवता यायला हव्यात. कारागिरांना आपल्या सेवांचा दर्जा वाढवण्यासाठी अनुकूल माहोल हवा.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अखंडित विजेसाठी मोठा निर्णय!

## ...तर मंत्रिमंडळात असा निर्णय घेणारं महाराष्ट्र पहिलं राज्य ठरेल!

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खंडीत वीज पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना विविध समस्येतून जावं लागतं. शेतीपिकांना हमीभाव मिळत नसल्याने मेटाकुटीला आलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या वीजेच्या थकबाकी आहेत. त्यामुळे सरकारकडून शेतकऱ्यांना स्वस्तात वीजपुरवठा व्हावा अशी मागणी सातत्याने लावून धरली जातेय. या मागणीला सरकारने आता सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.**




विजेबाबतची समस्या दूर करण्याकरता सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आज (१९ एप्रिल) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शेतीपंपांना अखंडित वीज पुरवठ्यासाठी सौर कृषी वाहिनी योजना २ ला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता स्वस्तात वीज उपलब्ध होऊ शकणार आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठक संपल्यानंतर माध्यमांना माहिती दिली. "राज्यात शेतीपंपांना अखंडित वीज पुरवठ्यासाठी सौर कृषी वाहिनी योजना २ प्रकल्प राबवला जाणार आहे. याकरता शेतकऱ्यांकडून जमिनी घेतल्या जाणार आहेत. तीस वर्षांच्या करारावर या जमिनी घेतल्या जाणार असून याबदल्यात शेतकऱ्यांना मोबदला मिळणार आहे. तसेच यामध्ये दरवर्षी तीन टक्क्यांनी वाढही होणार आहे. तसंच, या योजनेकरता सरकारी जमिनींचाही वापर केला जाणार आहे", अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### मंत्रिमंडळातील महत्त्वाचे निर्णय

- केंद्राप्रमाणे दिव्यांग कर्मचाऱ्यांना ४ टक्के आरक्षण लागू
- २०२५ पर्यंत ३० टक्के वाहिन्यांना सौर ऊर्जेचा पुरवठा करणार
- अकृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देणार
- पुणे पालिका हद्दीत निवासी मालमत्तांना दिलेली सवलत कायम ठेवण्यात येणार
- पालिका हद्दीतील मालमत्ता करांत तब्बल ४० ट» क्क्यांची सवलत
- पुनर्जीवित, पुनर्रचित साखर कारखाना, सूतगिरणीसाठी तात्पुरती समिती नेमणार
- पुण्यातील दौंडमध्ये दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास मान्यता
- मराठी भाषा भवनाच्या सुधारित आराखड्याला मान्यता
- बीएससी पॅरामेडिकलच्या रेसिडन्ट विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळणार

ते पुढे म्हणाले की, "या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात जमिनीची उपलब्धता होईल. सध्या आम्हाला सात रुपये दराने वीज उपलब्ध होते, ती वीज आम्ही शेतकऱ्याला दीड रुपये दराने देतो. परंतु, सोलारची वीज सरकारला तीन ते साडेतीन रुपयांनी मिळाल्यास शेतकऱ्यांना आणखी स्वस्तात वीज उपलब्ध होणार आहे. तसंच, सबसिडीतही मोठ्या प्रमाणात घट होणार आहे. शिवाय, सोलारची वीज दिवसाही मिळेल. तर, असं निर्णय घेणार देशातील पहिलं राज्य ठरणार", असंही फडणवीसांनी स्पष्ट केलं.

# बरं झालं अजित पवारांनीच हे कारस्थान उधळून लावलं

## बंडखोरीच्या चर्चेवरून ठाकरे गटाचा भाजपावर हल्लाबोल!

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीचे नेते अजित पवार पक्षात बंडखोरी करणार असल्याच्या चर्चांना काल उधाण आले होते. एका वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानंतर राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्क लढवले गेले. मात्र, त्यानंतर अजित पवारांनी, "या बातम्यांमध्ये काहीही तथ्य नाही", अशी स्पष्टोक्ती दिली. दरम्यान, यावरून आता शिवसेनेच्या ठाकरे गटाने भाजपावर टीकास्त्र सोडलं आहे.**



### बावनकुळे आणि शेलारांवर खोचक टीका

पुढे बोलताना त्यांनी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार आशिष शेलार यांच्यावरही खोचक शब्दांत टीका केली आहे. "भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे हे एक गंमतीशीर गृहस्थ आहेत व त्यांच्या विधानांकडे निव्वळ गंमत म्हणूनच पाहावे लागेल. आता बातमी आली की, महाराष्ट्रातील दोन महत्त्वाच्या भाजपा नेत्यांना दिल्लीत महत्त्वाच्या बैठकीसाठी तातडीने बोलावले. आता हे महत्त्वाचे नेते कोण, तर बावनकुळे व आशीष शेलार. म्हणजे अजित पवारांसारखा बलदंड नेता ४० आमदारांसह भाजपात प्रवेश करतोय आणि त्याबाबत चर्चा करायला कोण दिल्लीत जात आहेत, तर हे दोन 'वेलदोडे'. तेव्हा कोणत्या वावड्या किती गांभीर्याने घ्यायच्या? याचा विचार करायला हवा", असं ते म्हणाले.

अजित पवारांविरोधात वावड्या उठवून वातावरण गढूळ करण्याचे काम भाजपानेच केलंय, असं ते म्हणाले. ठाकरे गटाने मुखपत्र असलेल्या 'सामना' वृत्तपत्रातून ही टीका करण्यात आली.ठाकरे गटाने नेमकं काय म्हटलंय? "भाजपाकडे स्वतःचं असं काहीही नाही. दुसऱ्या पक्षांतले लोक उधार घेऊन ते स्वतःचा पक्ष चालवत आहेत. कधी शिवसेना, तर कधी राष्ट्रवादी काँग्रेस फोडून स्वतःचे घर भरतात. काँग्रेसवरही त्यांची वाईट नजर आहेच. धमक्या, दबाव आणि तपास यंत्रणांची सुरामारी यामुळे महाराष्ट्रासह देशात लोकशाही तसेच कायद्याचे राज्य संपवून टाकलं. अजित पवारांच्या बाबतीत वावड्या आणि रेवड्या उठवून वातावरण गढूळ करण्याचे काम भाजपानेच केले. महाराष्ट्राला अस्थिर, बदनाम व गोंधळ निर्माण करण्याचे हे कारस्थान आहे. बरे झाले, अजित पवार यांनीच हे कारस्थान उधळून लावले. त्यामुळे तूर्तास तरी या विषयाला पूर्णविराम मिळाला आहे", अशी टीका ठाकरे गटाने केली आहे.

**"वावड्या उठवणाऱ्यांनी राजकीय भान ठेवायला हवं"**

"अजित पवार हे मंगळवारी सकाळी विधान भवनातील त्यांच्या कार्यालयात गेले व तेथे त्यांना त्यांच्या पक्षाचे आमदार भेटायला आले. यात नवल ते काय? अजित पवार हे विधिमंडळ पक्षाचे नेते आहेत व पक्षाचे बरेचसे काम तेच पाहतात. त्यामुळे वावड्या उठवणाऱ्यांनी राजकीय भान ठेवायला हवे", असंही ठाकरे गटाने म्हटलं आहे.

# देशात उष्णता वाढली!

## बहुतांश शहारात तापमानाचा पारा 40 ते 44 अंश सेल्सिअसच्या आसपास

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**देशातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठे उन्हाचा कडाका जाणवत आहे, तर कुठे ढगाळ वातावरण तर कुठे पाऊस पडत आहे. सध्या देशातील तापमानात कमालीची वाढ झाली आहे. बहुतांश शहरात तापमानाचा पारा हा 40 ते 44 अंश सेल्सिअसच्या आसपास गेला आहे. उष्णतेचा नागरिकांना त्रास होत असून, दुपारच्या वेळी रस्ते रिकामे दिसत आहेत.**



उत्तर प्रदेशातील हमीरपूर आणि प्रयागराज इथं 44.2 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. सफदरजंग हवामान केंद्राने दिलेल्या माहितीनुसार दिल्लीतील कमाल तापमान 40.4 अंश सेल्सिअस नोंदवले आहे. जे सामान्य तापमानापेक्षा चार अंशांनी जास्त आहे. दिल्लीत सलग चौथ्या दिवशी कमाल तापमान हे 40 अंश सेल्सिअसच्या वर नोंदवले गेले. पुसा आणि पीतमपुरा भागात कमाल तापमान अनुक्रमे 41.6 अंश ते 41.9 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले.

**पंजाब हरियाणातही तापमानाचा पारा वाढला**

पंजाबमधील भटिंडा येथे 41 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. तर अमृतसरमध्ये 36.6 अंश सेल्सिअस आणि पटियालामध्ये 41.2 अंश सेल्सिअसवर तापमानाची नोंद झाली. पंजाब हरियाणाची राजधानी असलेल्या चंदीगडमध्ये 39.4 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

**राजस्थानच्या वाळवंटी भागात तापमान वाढ**

राजस्थानच्या वाळवंटी भागात तापमानात चांगलीच वाढ झाली आहे. चित्तोडगडमध्ये 43.2 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. त्यानंतर कोटा (42.8 अंश), बांसवाडा (42.7 अंश), फलोदी (42.2 अंश), ढोलपूर (42 अंश), अलवर आणि सवाई माधोपूर (प्रत्येकी 41.7 अंश) आहे. ) टोंक (41.6 अंश), चुरू आणि पिलानी (प्रत्येकी 41.4 अंश), बारमेर (41.2 अंश) आणि जयपूर (40 अंश सेल्सिअस)

**आंध्र प्रदेशमध्ये तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा**

शिमला, मनाली, धर्मशाला आणि नारकंडा या लोकप्रिय पर्यटन स्थळांमध्ये अनुक्रमे 25.4 अंश, 21 अंश, 28.2 अंश आणि 19.2 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. आंध्र प्रदेश राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (APSDMA) मंगळवारी एका मंडलात तीव्र उष्णतेची लाट आणि राज्यभरातील आणखी 117 ठिकाणी उष्णतेच्या लाटेची स्थिती असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

### पश्चिम बंगालमध्ये तापमानात वाढ

**» पश्चिम बंगालमध्ये बांकुरा येथे सर्वाधिक 43.7 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर राजधानी कोलकात्यात कमाल 40 अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे. हरियाणा आणि पंजाबमध्ये उष्ण हवामानाची स्थिती कायम राहिली असून दोन्ही राज्यांच्या बहुतांश भागात कमाल तापमान 40 अंशांच्या वर पोहोचले आहे. हरियाणातील हवामान विभागाच्या अहवालानुसार, हिसारमध्ये तापमानाचा पारा 41.4 अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. हरियाणातील कर्नालमध्ये 40.7 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर अंबालामध्ये 39.7 अंश सेल्सिअस, नारनौल येथे 40.2 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.**

### महाराष्ट्रातही तापमानात वाढ

**» महाराष्ट्रातही तापमानात दोन ते तीन अंशांनी वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. पुढील दोन दिवस विदर्भाच्या तापमानात अधिक वाढ होण्याचा इशाराही हवामान विभागानं दिला आहे.**

---

# कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मईंचा उमेदवारी अर्ज दाखल

## शक्तिप्रदर्शन, समर्थकांचा जल्लोष

। कर्नाटक । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी हावेरी जिल्ह्यातील शिग्गाव या त्यांच्या हक्काच्या मतदारसंघातून मोठे शक्तिप्रदर्शन करत व समर्थकांच्या जल्लोषात उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी बोम्मईसह भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि प्रख्यात कन्नड चित्रपट अभिनेते सुदीप उपस्थित होते. काँग्रेसने बोम्मईविरुद्ध हुबळी-धारवाडमधील 'अंजुमन-ए-इस्लाम'चे अध्यक्ष मोहम्मद युसूफ सावनूर यांना उमेदवारी दिली आहे.**



बोम्मई शिग्गावमधून पुन्हा निवडणूक लढवत आहेत. येथून ते २००८ पासून तीन वेळा आमदार झाले आहेत. तत्पूर्वी, त्यांनी विविध मंदिरांत जाऊन दर्शन घेतले. तसेच शिग्गावमध्ये नड्डा व सुदीप यांच्यासोबत मोठी प्रचारफेरीही (रोड शो) काढली. नंतर बोम्मई, नड्डा व सुदीप यांनी जाहीर सभेला संबोधित केले व बोम्मई आणि भाजपला भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.नड्डा म्हणाले, की बोम्मई यांनी भरलेला उमेदवारी अर्ज केवळ आमदारपदासाठी नसून, तो कर्नाटकला विकासासाठी दिशादर्शक आहे. मी फक्त बोम्मईंसाठी मते मागण्यासाठी आलो नाही, तर कमळ चिन्हासाठी बहुमत मागायला आलो आहे. भाजपला बहुमत मिळाल्यास कर्नाटकात सतत विकासाची गंगा सातत्याने वाहत राहील.

भाजपने वरुणातून सिद्धरामय्यांविरुद्ध विद्यमान मंत्री व्ही. सोमण्णा यांना उमेदवारी दिली आहे. सिद्धरामय्या यांचे पुत्र डॉ. यतींद्र सिद्धरामय्या हे काँग्रेसचे वरुणाचे विद्यमान आमदार आहेत.

### राभाजपच्या 40 'स्टार' प्रचारकांमध्ये मोदी, आदित्यनाथ, फडणवीस

**»विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने ४० प्रमुख 'स्टार' प्रचारकांची यादी मंगळवारी जाहीर केली. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि प्रमुख केंद्रीय मंत्र्यांचा समावेश आहे.**

**केंद्रीय मंत्र्यांत राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन, स्मृती इराणी, धर्मेंद्र प्रधान, मनसुख मंडाविया आणि प्रल्हाद जोशींचा समावेश आहे.**

**आदित्यनाथ यांच्याशिवाय मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता विश्वशर्मा आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश करण्यात आला आहे.**

### वरुणातून उमेदवारी अर्ज दाखल

» काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विधानसभा निवडणुकीसाठी शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज बुधवारी भरला. मैसूरु जिल्ह्यातील वरुणा मतदारसंघातून ते निवडणूक लढवणार आहेत. विधानसभेचे विद्यमान विरोधी पक्षनेते असलेल्या सिद्धरामय्यांसह अर्ज दाखल करण्याच्या प्रसंगी माजी मंत्री एच. सी. महादेवप्पा व इतर काँग्रेस नेते उपस्थित होते.

उमेदवारी दाखल करण्यापूर्वी सिद्धरामनहुंडी या त्यांच्या मूळ गावातील मंदिरात त्यांचे कुलदैवत सिद्धरामेश्वराची प्रार्थना केली आणि तेथे श्रीराम मंदिरातही पूजा-प्रार्थना केली.

# वीणा जगतापचं पुन्हा पॅचअप?

मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री वीणा जगताप आणि अभिनेता शिव ठाकरे हे दोघेही कायमच चर्चेत असतात. शिव ठाकरे आणि वीणा जगताप ही जोडी बिग बॉस मराठीमुळे प्रसिद्धीझोतात आली. शिव ठाकरे आणि वीणा जगताप यांची लव्हस्टोरी खूप गाजली. बिग बॉसच्या घरात या दोघांमध्ये प्रेम फुललं होतं. पण काही महिन्यांनी त्या दोघांचा ब्रेकअप झाला. आता ते दोघेही एका वेगळ्याच कारणांनी चर्चेत आले आहे.

नुकतंच वीणा जगतापने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात वीणाने छान चॉकलेटी रंगाची साडी नेसत फोटो पोस्ट केला आहे. त्याबरोबर तिने गजरा, बांगड्या, ठूशी असा पारंपारिक लूकही केला आहे. यात तिच्या भांगेत कुंकू भरल्याचेही पाहायला मिळत आहे.वीणाने हा फोटो शेअर करत "प्यार हुआ,,,,इकरार हुआ" असे म्हटले आहे. त्याबरोबर तिने दोन हार्ट इमोजीही शेअर केले आहेत.

तर दुसरीकडे वीणाचा एक्स बॉयफ्रेंड शिव ठाकरेनेही त्याच वेळी एक फोटो पोस्ट केला आहे. या फोटोत शिवने चॉकलेटी रंगाचे ब्लेझर परिधान केले आहे. याला त्याने हटके कॅप्शनही दिले आहे.

वीणा आणि शिवने एकाच वेळी एकाच रंगाचे कपडे परिधान करत फोटो शेअर केल्याने चर्चांना उधाण आले आहे. अनेक नेटकऱ्यांना ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी यावर कमेंट करायला सुरुवात केली आहे. "क्या बात है, शिव-वीणा ट्वीनिंग करत आहेत", अशी कमेंट एकाने केली आहे. तर काहींनी "शिवची आठवण आली का", असा प्रश्न तिला विचारला आहे. तर एकाने "शिवबरोबर पॅचअप कर ना? तुमची जोडी खूप सुंदर आहे", असे म्हटले आहे.



# एनटीआरसोबत काम करण्यास सैफ उत्साहित...

ज्युनियर एनटीआर त्याच्या 'एनटीआर ३०' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान देखील या चित्रपटाचा एक भाग आहे आणि त्याने त्याचे शूटिंग देखील सुरू केले आहे. अलीकडेच चित्रपटाच्या सेटवरून ज्युनियर एनटीआरचे सैफ अली खानसोबतचे फोटो व्हायरल झाले होते. सैफ अली खान या तेलगू चित्रपटात काम करण्यासाठी खूप उत्सुक आहे.



कोरताला शिवा दिग्दर्शित या चित्रपटाचे शीर्षक अद्याप ठरलेले नाही. सैफने अलीकडेच एका मीडिया मुलाखतीत या चित्रपटाबद्दल आणि तेलुगू चित्रपटसृष्टीतील त्याच्या प्रवेशाबद्दल सांगितले. तो म्हणाला, 'मी खूप उत्साहित आहे! हे नवीन क्षेत्र आहे. सेट व्यवस्थित आहे. लोकांची वागणूक देखील खूप चांगली आहे. खूप छान वेळ जातोय.'

भूमिका खूपच छान आहे. मी माझ्या व्यक्तिरेखेसाठी खूप मेहनत घेत आहे.' सैफ अली खाननेही कोरताला शिवाचे कौतुक केले आणि म्हणाला, 'माझा दिग्दर्शक खूप उत्साही व्यक्ती आहे. त्याने मला या चित्रपटाची स्क्रिप्ट तीन तास सांगितली, जी मला खूप आवडली. या चित्रपटाशी मी भावनिकरित्या जोडलो गेलो आहे.'

यादरम्यान ज्युनियर एनटीआरबद्दल बोलताना सैफ म्हणाला, 'तो खूप मिलनसार आहे. ज्युनियर एनटीआर स्वतः या चित्रपटाबद्दल खूप उत्सुक आहे आणि त्याची योजना वेगळी आहे.' सैफ अली खान आणि ज्युनियर एनटीआर व्यतिरिक्त जान्हवी कपूर देखील या चित्रपटाचा एक भाग असणार आहे.



# लग्नाआधीच इलियाना होणार आई

बॉलिवूड अभिनेत्री इलियाना डिक्रूझनेअनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. इलियाना ही सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असते. इलियाना तिच्या विविध लूकमधील फोटो सोशल मीडियावर शेअर करते. इलियानानं नुकतीच एक खास पोस्ट शेअर केली आहे. तिच्या या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. या पोस्टच्या माध्यमातून तिनं चाहत्यांना गुड न्यूज दिली आहे.

इलियानाने मंगळवारी (18 एप्रिल) सोशल मीडियावर तिच्या प्रेग्नन्सीची घोषणा केली आहे. इलियानाने दोन फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यामधील एका फोटोमध्ये एका छोट्या मुलाच्या ड्रेस दिसत आहे. तर दुसऱ्या फोटोमध्ये 'मामा' हे पेंडेंट दिसत आहे. हे फोटो शेअर करुन त्यानं कॅप्शनमध्ये लिहिलं, 'कमिंग सून,माझ्या लहान डार्लिंगला भेटण्याची मी वाट बघत आहेत.'

इलियानाच्या या पोस्टला अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहे. इलियानाच्या प्रेग्नन्सीच्या घोषणेनंतर तिच्या चाहत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यामातून तिला शुभेच्छा दिल्या आहेत. इलियानानं शेअर केलेल्या पोस्टला एका युझरनं कमेंट केली, 'होणाऱ्या बाळाचे वडील कोण आहेत?' तर दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट केली, 'तुझं लग्न झालं आहे का?' अनेकांनी इलियानाच्या या पोस्टला लाइक केलं आहे.



# प्रियांका चोप्रा ॲक्शन मोडमध्ये

बॉलिवूडची देसी गर्ल अशी ओळख असणारी अभिनेत्री प्रियांका चोप्रा ही सध्या तिच्या 'सिटाडेल' या आगामी सीरिजचे प्रमोशन करत आहे. प्रियांका तिच्या हॉलिवूड प्रोजक्ट्समुळे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. सिटाडेल सीरिजमध्ये प्रियांका चोप्रा खतरनाक स्टंट सीन्स करताना दिसणार आहे, ज्याची झलक या सीरिजच्या ट्रेलरमध्ये पाहायला मिळाली आहे. आता प्रियांका चोप्राने सांगितले की, सीरिजमधील अनेक स्टंट तिने स्वतः केले आहेत. एका मुलाखतीदरम्यान प्रियंकाने सिटाडेल या वेब सीरिजमधील तिच्या ॲक्शन सीन्सबद्दल सांगितले. ती म्हणाली, 'मी ॲक्शन फिल्म्सच्या बॅकग्राऊंडमधून आली आहे. मी बॉलिवूडमध्येही अनेक ॲक्शन चित्रपट केले आहेत. सिटाडेलची स्टंट टीम म्हणजे रुसो ब्रदर्स हे त्यांच्या कामात मास्टर आहेत. त्यांच्याकडून मला खूप काही शिकायला मिळाले. मी अहंकारी नाही. मी कधीच विचार करत नाही की मी इतके चित्रपट केले आहेत, त्यामुळे मला सर्व काही माहित आहे, परंतु मला शिकायला आवडते. विशेषत: जेव्हा एखाद्याला माझ्यापेक्षा जास्त अनुभव असतो. तेव्हा त्याच्याकडून मी शिकत असते.प्रियांका पुढे म्हणाली, ' सिटाडेल या वेब सीरिजमधील जवळपास 80 टक्के स्टंट मी स्वतः केले आहेत, कारण मला माझ्या शरीरावर आणि माझ्या ज्ञानावर माझा विश्वास होता, पण मी खूप काही शिकले आहे आणि या शोमध्ये मी जे ॲक्शन सीन्स केले आहेत, ते खूप वेगळी आहे. जे मी यापूर्वी कधीही केले नव्हते.'

सिटाडेल कधी होणार रिलीज?

प्रियांकाची सिटाडेल ही सीरिज 28 एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'सिटाडेल' ही सीरिज जगभरातील 240 हून अधिक देशांमध्ये स्ट्रीम केली जाणार आहे. 'सिटाडेल' या वेब सीरिजची निर्मिती 236 मिलियन डॉलरमध्ये करण्यात आली आहे, असं म्हटलं जात आहे. ही सीरिज भारतातील लोक हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड या भाषांमध्ये पाहू शकणार आहेत. प्रियांकाच्या या सीरिजची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. प्रियांकाच्या आगामी चित्रपटांची तिचे चाहते उत्सुकतेने वाट बघतात. प्रियांका ही 'जी ले जरा'या चित्रपटामधून देखील लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

# ‘जॉस’ द बॉसची ‘यशस्वी’ खेळी फोल!

## लखनऊचा राजस्थान रॉयल्सवर दणदणीत विजय

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियममध्ये राजस्थान रॉयल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात आयपीएलचा २६ वा सामना रंगतदार झाला. राजस्थानने नाणेफेक जिंकू प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या लखनऊ सुपर जायंट्सने २० षटकांत ७ विकेट्स गमावत १५४ धावांपर्यंत मजल मारली.**

विजयसाठी १५५ धावांचा पाठलाग करण्यासाठी लखनऊच्या सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल आणि जॉस बटलरने आक्रमक खेळी केली. जैस्वालने ३५ चेंडूत ४४ धावांची खेळी साकारली. तर जॉस बटलरने ३९ चेंडूत ३९ धावांची सावध खेळी करत राजस्थानला विजयाच्या दिशेनं नेलं. परंतु, लखनऊच्या भेदक माऱ्यापुढं राजस्थानच्या फलंदाजांनी नांगी टाकली आणि लखनऊचा या सामन्यात दणदणीत विजय झाला. राजस्थानने २० षटकात ७ विकेट्स गमावत १५४ धावा केल्या. त्यामुळे लखनऊने या सामन्यात बाजी मारली. लखनऊसाठी मार्कस स्टॉयनिसने दोन विकेट्स घेत राजस्थानला मोठा धक्का दिला. खेळपट्टीवर सेट झालेल्या दोन्ही सलामीवीर फलंदाजांना बाद करण्यात स्टॉयनिसला यश आलं. तसंच आवेश खानने मोक्याच्या क्षणी धडाकेबाज फलंदाज शिमरन हेटमायरला फक्त २ धावांवर बाद केलं. त्यानंतर राजस्थानच्या संघावर दबाव आल्याने धावांची गती मंदावली होती. आवेश खानने ३ विकेट घेतल्या तर मार्कस स्टॉयनिसने २ विकेट घेत राजस्थानच्या विजयाच्या आशा मावळल्या.राजस्थानचा वेगवान गोलंदाज जेसन होल्डरने के एल राहुलला बाद करत लखनऊला पहिला धक्का दिला होता. त्यानंतर ट्रेंट बोल्टने आयुष बडोनीला अवघ्या एका धावेवर बाद करून लखनऊच्या संघाला दबावात टाकलं. परंतु, केली मायर्सने आक्रमक खेळी करत लखनऊचा डाव सावरला आणि यंदाच्या आयपीएलमध्ये तिसरं अर्धशतक ठोकलं. मात्र, धावांसाठी संघर्ष करणारा दीपक हुड्डा आश्विनच्या गोलंदाजीचा शिकार झाला. हुड्डा फक्त २ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर केली मायर्स आक्रमक अंदाजात फलंदाजी करत असताना आश्विनने



भेदक मारा करत मायर्सला ५१ धावांवर क्वीन बोल्ड केलं. त्यानंतर मार्कस स्टॉयनिस आणि निकोलस पुरनने लखनऊच्या संघाची कमान सांभाळली. राजस्थान रॉयल्ससाठी आर आश्विनने दोन विकेट्स घेतल्या. जेसन होल्डर आणि ट्रेंट बोल्टला प्रत्येकी एक विकेट मिळाली. तर संदीप शर्माने मार्क स्टॉयनिसला २१ धावांवर बाद केलं. तसंच निकोलस पुरनला संजू सॅमसनने २९ धावांवर धावबाद केलं.

# सचिनला संपूर्ण IPL मध्ये जे करता आलं नाही ते अर्जुनने करुन दाखवलं..

## रवी शास्त्रींचं अजब वक्तव्य !

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर याने सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध मुंबई इंडियन्सच्या शेवटच्या षटकात आपल्या चमकदार कामगिरीने सर्वांनाच चकित केले. यावर रवी शास्त्री काय म्हणाले पाहूया.**

### वडिलांपेक्षा मोठे काम केले

**सामना संपल्यानंतर माजी भारतीय क्रिकेटपटू आणि अनुभवी समालोचक रवी शास्त्री अर्जुनशी बोलताना म्हणाले, “अर्जुन, तू तुझ्या वडिलांपेक्षा (सचिन तेंडुलकर) मोठे काम केले आहेस. त्यांच्या आयपीएल कारकिर्दीत त्याने एकही विकेट घेतली नाही, पण आज तू एक विकेट मिळवलीस."**

सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकर सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. मुंबई इंडियन्सचा नवोदित वेगवान गोलंदाज अर्जुन तेंडुलकर याने शेवटच्या षटकात आयपीएलमधील मेडेन विकेट मिळवली. तेव्हापासूनचा तो चर्चेत आहे. प्रत्येकाने यावर काही ना काही प्रतिक्रिया दिली. पण रवी शास्त्रींची यावरील प्रतिक्रिया अजून चर्चेचा विषय ठरली. सामना संपल्यानंतर माजी भारतीय क्रिकेटपटू आणि अनुभवी समालोचक रवी शास्त्री अर्जुनशी बोलताना म्हणाले, “अर्जुन, तू तुझ्या वडिलांपेक्षा (सचिन तेंडुलकर) मोठे काम केले आहेस. त्यांच्या आयपीएल कारकिर्दीत त्याने एकही विकेट घेतली नाही, पण आज तू एक विकेट मिळवलीस."शास्त्रींच्या विधानाला उत्तर देताना, ज्युनियर तेंडुलकरने त्याच्या लाईनअप आणि लेंग्थबद्दल आणि मैदानावर आपल्या रणनिती कशा अंमलात आणल्या याबद्दल बोलला. तो म्हणाला, “मी हे सरळ सोपे ठेवले आणि रणनितीनुसार गोलंदाजी केली."

सचिनने २००८ ते २०१३ या कालावधीत आयपीएलच्या ७८ सामन्यांमध्ये खेळला आहे आणि या ६ हंगामात ६ षटकेही टाकली पण त्याला एकही विकेट मिळवता आली नाही, परंतु अर्जुनने दुसऱ्याच



सामन्यात पहिली IPL विकेट घेतली घेऊन तू त्याच्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकले आहे, असं ही ते म्हणाले.सामन्याबद्दल बोलायचे झाले तर मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ५ बाद १९२ धावा केल्या. कॅमेरॉन ग्रीनने ४० चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद ६४* धावा केल्या. त्याचवेळी या आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादने सातत्याने विकेट गमावल्या. मयंक अग्रवाल (४८) आणि हेनरिक क्लासेन (३६) यांनी चांगली खेळी केली पण आपल्या संघाचा पराभव टाळता आला नाही. आणि मुंबईच्या संघाने हा सामना १४ धावांनी जिंकला.